Illiteracy means ignorance!
Ignorance means moral degradation!
Moral degradation means lack of progress!
Lack of progress means poverty!
Poverty brings untold suffering to our poor.
Such is the misery caused.
By want of just one thing – education!
**-Mahatma Jyotiba Phule**

विद्येविना मती गेली ।
मतीविना निती गेली ।
नितीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्तविना शुद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।
**- महात्मा ज्योतिबा फुले**

तुमच्या समोर मांडण्यात येणारा हा आमच्या संस्थेचा पारदर्शक (आरसा) आहे. ह्यातुन संस्थेचा हेतु, ध्येय आपल्या लक्षात येतील. संस्थेची आज पर्यंतची कार्किर्दे आपल्या लक्षात येईल. संस्थेस इथवर पोहोचण्यास अनेक वादळास, अडथळयास सामोरे जावे लागले परंतु त्या सर्वास पार करून आज आपल्या समोर दिमाखात, कमी वेळेत उत्तुंग असे यश कमविणारी संस्था उभी आहे. त्याचे कारण संस्थेचे पारदर्शक व स्वच्छ उद्दीष्टे आजच्या या स्पर्धेच्या युगात हीच उद्दीष्टे संस्थेस टिकवुन ठेवतात अ पुढे जाण्याचे बळ देतात.

या इवल्याश्या रोपाच वृक्षात रूपांतर होण्यासाठी अनेकांचे पाठबळ आहे. त्या सर्वाचे प्रथम शतशः आभार.

★ **प्रस्तावणा :-** ज्ञानासारखे श्रेष्ट दान नाही, व ज्ञानासारखे श्रेष्ट कार्य नाही, ही विचाधारणा मनी ठेवुन ज्ञानदानाचे पवित्र काम हाती घेण्याचा दृढ निश्चय ठरला. या मनात आलेल्या विचारास आकृतीत रूपांतर करण्यासाठी अनेक लखलखणारे, गजबजणारे शहरे समोर आली परंतु संस्थेचे पैसा हे ध्येय नव्हते ज्ञानदान हे योग्य ठिकाणी व्हावे ही देखील धडपड होती. त्यामुळे अनेक गजबजणाय्रा शहरातुन पाऊले बाहेर घेऊन मिणमिणत्या प्रकाश्यात लखलखणरे एक गाव समोर आले.

कविवर्य मोरोपंत यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बारामती शहरातील सांप्रदायीक समाजाचा वारसा लाभलेले “ डोर्लेवाडी” हे गाव.

गाव फार काही मोठे नव्हते पण मोठे होते ते लोकांची मने व त्यांना वारसा हक्कात मिळालेले संस्कार. संस्काराचा वारसा असणऱ्या मातीच्या गोळयाला उच्च शिक्षणचे जर गती देणारे चाक मिळाले तर त्यातुन घडणारि भावीपिढी ही निश्चीतच उत्कृष्ट ठरेल. उद्याच्या उज्वल भारतासाठी, उत्तम नागरीक बनवण्यासाठी ह्या गावातील मुलांना जर शिक्षणाची जोड दिली तर नक्कीच उत्तम कार्य घडेल. या निश्चयाने संस्थेच्या जागेची निश्चीती झाली.

संस्थेचा हेतु प्रत्येक मुलास उच्चशिक्षण मिळावे यासाठी सुरवाती पासुन संस्था धडपडत राहीली अगदी प्रत्येक घरोघरी जाऊन मुलांच्या शाळेत दाखल्यासाठी मागणी झाली. ह्या मागील हेतु हाच आपल्या हातुन परीस्थीमुळे एखादा हिरा पैलु पाडण्यावाचुन राहु नये. अश्या परीस्थीतीनी व्याधलेल्या मुलांसाठी संस्थेच्या सुरवातीच्या काळातही संस्थेने काही मुलास मोफत शिक्षण दिले. अत्यंत अत्यल्प असा फीशुल्क आकारून संस्थेने आपली पाऊले पुढे टाकली.

संस्थेचा हेतु गरीबातील गरीब विद्यार्थ्यांना ही उच्च शिक्षण मिळावे पण पैश्या अभावी मुले उच्च शिक्षणापासुन वंचित रहात होते या मुलांसाठी खुप करण्याची इच्छा मनी होती पण संस्था हतबल होती. परंतु न थांबता संस्था प्रयत्न करत होती व चार वर्षाच्या अटीतटीच्या प्रयत्नानंतर शेवटी हा मानस पुर्ण झाला. २०१२ साली संस्थेच्या विनाशुल्क ज्ञानदानाचा प्रयत्न यशस्वी झाला. संस्थेचे पुढचे पाऊल होते मुलांना ई-लर्निंग शिक्षण देणे.

आजच्या विज्ञान युगात संअगणकीय जगात मुलांना संगणकाचे ज्ञान आवश्यकच होते. निर्माण होणाऱ्या पिढीस आजच्या पिढीस नेहमी नाविण्य हवे असते. निर्माण होणारी पिढी ही मागील पिढीच्या दोन पाऊले पुढे धावणारी निर्माण होतीये. यांना खिळवुण ठेवणे अगदी अशक्य: सर्व कलागुणाची शिदोरी घेऊन येणारी ही पिढी यांच्यासाठी काहीतरी असे हवे होते जे त्यांना भरपुर ज्ञान ही देईल व त्यांच्या ज्ञानाला पुढे जाण्याचा वाव ही देईल.

अशी गोष्ट संस्थेच्या हाती आली ती म्हणजे ई-लर्निंग ह्या बद्दल सांगावे व बोलावे तेवढे कमीच आहे. ह्यामध्ये प्रत्येक गोष्ट प्रात्यक्षिकाने निदर्शनास आणुन दिली जाते. मुलांची बौध्दीक चाचणी घेतली जाते. याचे विशेष म्हणजे मुलांची शिक्षणाची रूची वाढते. या सर्वांचा विचार करून २०११ – २०१२ पासुन संस्थेने ई-लर्निंग चे शिक्षण मुलांसाठी सुरू केले.

★ **स्कुल बस :-** डोर्लेवाडीतील मुलांचा विचार करून उभारण्यात आलेल्या या संस्थेचा इतरही गावातील मुले लाभ घेऊ इच्छीत होती. इतर परीसरातुन संस्थेकडे धाव घेणारी मुले अनेक होती. या लावण्यात येणाऱ्या रोपाच्या फांद्या छाटत राहण्यापेक्षा याचे वृक्षात रूपांतर करावे इतर परीसरातील मुलांनाही याचा लाभ व्हावा यासाठी संस्थेने स्कुल बसची सोय केली.

★ **बैठक व्यवस्था :-** विद्यार्थ्यांना व्यवस्थीत न त्रास होता वर्गात बसता यावे, सुंदर अक्षरात लिहीता यावे यासाठी त्यांना आकर्षित करणाऱ्या विविध रंगात विद्यार्थ्यासाठी बेंचेस उपलब्ध करून दिले. वैयक्तीक लक्ष देण्याच्या हेतुने प्रत्येक वर्गामध्ये फक्त ३० विद्यार्थ्यांनसाठी बैठक व्यवस्था केलेली आहे.

★ **पिण्याचे पाणी :-** आजच्या दुषित वातावरणची व मुलांमधील वाधत्या आजाराची कल्पना असल्याने मुलांना पिण्यासाठी जलशुध्दीकरण (वॉटर प्युरीफायर) ची सोय केलेली आहे.

★ **मोफत आरोग्य तपासणी :-** विद्यार्थ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी केली जाते तसेच विद्यार्थ्यास आवश्यक असे व्हिटामीन डोस, लस, देण्यात येतात. विद्यार्थ्याची ऊंची व वजन यांच्या वाढीच्या नोंदी ठेवल्या जातात.

★ **खेळ :-** मुलांना खेळण्यासाठी विविध साधने उपलब्ध करून दिली जातात फुटबॉल, एज्युकेशनल गेम.

★ **शाळेत विद्यार्थ्यासाठी देण्यात येणारे प्रकल्प:-** विद्यार्थ्याची चौकस वाढ व्हावी यासाठी संस्था नेहमी प्रयत्नात असते. विद्यार्थ्यीचा अभ्यासाबरोबर इतर गोष्टीतही विकास व्हावा यासाठी संस्था मुलांना काही प्रकल्प करण्यास देते त्या प्रकल्पाला मुले त्यांच्या बुध्दीचा वापर करून कसे नाविण्य देतात हे संस्थेस पहायचे असते. विद्यार्थीच्या कल्पनांना एक मोकळी वाट द्यायची असते यासाठी असे प्रकल्प राबविण्यात येतात.

★ **२०११-१२ मध्ये राबविण्यात येणारे निवडक प्रकल्प किल्ले तयार करणे:-** सिमेंटच्या जंगलाने वेढलेल्या परीसरामध्ये आजकाल मातीचे बनविलेले दिवाळीतील किल्ले कुठे दिसत नाहीत. पुर्वी दारोदारी मोठे मोठे रचनात्मक किल्ले सजविण्याची पध्दत आता हरवलेलीच दिसते. आता रेडीमेड किल्ले आपल्या नजरेस पडतात.

शिवाजी राज्यांनी अनेक किल्ले सर केले होते. त्यांनी केलेले पराक्रम, धाडस, शौर्य आपण त्यांच्या गोष्टी मुलांना सांगतो व आपला मुलगा ही शिवबा सारखा शुर्वीर व्हावा अशी स्वप्ने पाहतो. पण हे विसरतो शिवाजी राज्यांने या वयात किल्ले सर केले होते. आपण आपल्या मुलांना साधे मातीचेही किल्ले बनवु देत नाहीत. मग का आपल्या कडून शिवाजी घडेल? हाच विचार करून मुलांना हा प्रकल्प देण्यात आला. विद्यार्थ्यांनीही अतीशय उत्तमरीत्या त्यांच्या मनातल्या किल्ल्याच्या कल्पना प्रकल्पातुन समोर मांडल्या

★ **पुठ्ठ्यांची घरे तयार करणे :-** या प्रकल्पामुळे मुलांना पुठ्ठ्यांची त्यांच्या कल्पने नुसार घरे तयार करण्यास सांगीतली मुलांनी त्यांच्या कल्पनेने विविध प्रदेशातील घरे तयार केली. ह्या घरांची पाहणी झाल्यानंतर ही घरे स्क्रॅप मध्ये न टाकता त्या घरांचा पुनरउपयोग पक्ष्यांच्या राहण्यासाठी केला गेला.

सिमेंटच्या जंगलात हरवलेली झाडे व दुर्मिळ झालेली पक्ष्यांची घरे याचा विचार करून या घरांना झाडावर किंवा घराबाहेर घरात टंगण्यास सांगीतले त्यामध्ये त्यामध्ये थोडे गवत व पाण्यासाठी भांडे ठेवले व हाही मुलांचा प्रकल्प यशस्वी झाला अनेक पक्ष्यांनी ह्या घरांना आपले केले.

अश्या प्रकारचे अनेक प्रकल्प राबविण्यात आले त्यामध्ये मातीचे मणी करून त्याच्या माळा करणे, दिवळी, ख्रिसमस ग्रीटींग तयार करणे, अक्षरांचे तक्ते तयार करणे, वॉल हॅंगीग करणे, कागदी घड्याळ तयार करणे, नोटांचे तक्ते तयार करणे.

★ **आपण भारतीय आहे याचा अभीमान असावा:-** आपल्या देशात अनेकांनी प्राणाची आहुती दिली त्याची आपणास नेहमी जाणीव असावी “आपला भारत” म्हणुण निष्काळजी न राहता “माझा भारत” म्हणुण हक्काने त्याचे संरक्षण करावे याची शिकवण राष्ट्रीय सणांनमधुन दिली जाते.

१५ ऑगष्ट (स्वातंत्र दिन) व २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) हे अगदी सुंदर रूपात सादर केले जातात. या दिवशी काही मुलांना विभिन्न प्रदेशातील पेहरावात सजवले जाते कोणी हिंदु, मुस्लीम, गुजराती, बंगाली, महाराष्ट्रीयन व एकच भारत-माता यातुन हे दर्शविले जाते एका भारतात अनेक धर्माचे लोक वावरत आहेत. प्रभात फेरी काढली जाते विविध घोषणा दिल्या जातात. नंतर झेंडा गीत, स्वातंत्र्योपर गीत साजरे होतात. त्यानंतर विद्यार्थीची भाषणे होतात, खाऊ वाटप होतो सर्वांना स्वातंत्र्याच्या शुभेच्छा दिल्या जातात.

उच्च शिक्षणाबरोबर आपली भारतीय संस्कृतीही मुलांनी जोपासावी आपल्या संस्कृतीतील महत्वपुर्ण सण त्या मागील उद्देश मुलांना वेळोवेळी समजवले जातात. मुलांच्या इतर विकासाबरोबर संस्कृतीचाही विकास व्हावा त्याचा विद्यार्थींना विसर पडू नये व हे सण साजरे करतांना मुलांना आनंद मिळावा यासाठी विविध वार्षिक सण शाळेत साजरे केले जातात.

★ **गुरू पोर्णिमा :-** या दिवशी मुलांना शिक्षक गुरू म्हणजे काय? गुरूचा आदर करणे गुरूंचे आपल्या आयुष्यातील महत्व पटवून देतात. गुरू हे फक्त आपले शिक्षकच नसुन आपणास आयुष्यात कोठेही भेटलेला व्यक्ती जो आपणास काही ज्ञान देतो तो गुरू असतो मग ती आई असेल वडील असतील भाऊ बहीण असतील किंवा रस्त्यात दोन मिनीटे भेटलेला पण आयुष्यात नेहमी उपयोगी पडणारे ज्ञान देऊन गेलेला व्यक्ती असेल हे सर्व पदोपदी भेटलेले गुरूच असतात. त्यांनी दिलेल्या ज्ञानाची तर आपण परतफेड कोणत्याच रूपात करू शकत नाही. पण त्याचे आभार मानुन त्यांचा आशिर्वाद घेऊन कृतज्ञता व्यक्त करण्याचा हाच दिवस आपणास लाभलेला असतो. हे मुलांना समजवुन सांगण्यात येते.

★ **नागपंचमी :-** ह्या दिवशी मुलांना पारंपारीक हेपरावात बोलावले जाते. व झिम्मा फुगडी या सारखे खेळ खेळले जातात व मुलांना पतंग उडविण्यास दिले जातात. मुलांच्या उंच हवेत उड्णाय्रा पतंगातुन त्यांना उंच गगनात भरारी मारण्याचे सामर्थ्य शिकविले जाते. पतंगा प्रमाणे न कटता न डगमगता कितीही वादळांना सामोरे जाण्याचे शौर्य त्यांच्या मधे निर्माण केले जाते.

★ **दही हंडी :-** सर्वांचा लाडका गोपाल हा कोणी वेगळा नसुन त्यांचा सारखाच एक खोडकर बालक आहे हे मुलांना गोष्टीतुन सांगण्यात येते. ह्या दिवशी उंच दही हंडी उभारली जाते. व मुलांना मनोरे तयार करुन ती हंडी फोडण्यास सांगण्यात येते. फास्टफुड च्या जमान्यात हंडी फोडुन दही खातांना कृष्णा प्रमाणे धष्टपुष्ट राहुन जीवनातील अनेक घसरणाय्रा मनोय्रांना पार करण्याचे सामर्थ्य मुलांमध्ये निर्माण होते.

★ **फ्रेंडशिप डे :-** नाव इंग्रजी असले तरी नाते तेच मैत्रीचे, प्रत्येकास हवेहवेसे वाटणारे, या विमुकल्यांमध्येही ही नात्याची अतुट जोड असते कट्टी व बट्टी या दोन धाग्यांनी जोडलेली त्यांची ही निथळ व निरवळ मैत्री हातात फ्रेंडशिप रिबन बांधुन घट्ट करण्यात येते.

★ **दिवाळी :-** दिवाळी हा सर्वात मोठा भारतीय सण दिवाळी सणासाठी मुले आतुरतेने वाट बघत असतात. नविन कपडे, गोड खाऊ, फटाके उडविण्याचा आनंद, शळेस सुट्टी असे सर्व आवडीच्या गोष्टी ह्या सणात मुलांना एकत्र मिळतात. फटाके उअडविण्यास तर मुले अगदी आतुर झालेली असतात. पैश्याअभावी काही मुले या आनंदा पासुन वंचीत रहातात. सर्व मुलांना हा आनंद समान मिळावा यासाठी संस्था परीक्षा संपल्यानंतर एक दिवस मुलांना फटाके उडविण्यास ठेवते. प्रत्येक विद्यार्थ्यांस फटाके वाटप करण्यात येते. सर्व शिक्षकांच्या निरीक्षाणाखाली मुलांना फटाके उडविण्यास देण्यात येतात.

**"दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी**
**गाई म्हशी कोणाच्या ? लक्ष्मणच्या ......**

अश्या तोतय्रा शब्दात मुले दिवाळीचा आनंद लुटतात. फटाके उडवितांना थोडे वायु प्रदुषण होते पण फटाके उडवितांना फटाक्यांबरोबर मुले त्यांच्या मनातील प्रदुषण उडवुन देऊन चेहय्रावर आनंद घेऊन वावरतात तो आनंद सर्वांवर पडदा टाकतो.

★ **संत सावतामाळी पुण्यतीथी :-** कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असे म्हणणाय्रा थोर संताचा नावलौकीक घेऊन पुढे चाललेली आपली संस्था “संत सावतामाळी” पुण्यतीथी अगदी थाटात साजरी करते. मुलांना पारंपारीक पोशाखात बोलवुन टाळ-टिपय्रांच्या गजरात मुलांची मिरवणुक काढली जाते.

★ **सांस्कृतीक कार्यक्रम :-** मुलामध्ये शैक्षणिक विकासाबरोबर इतरही कलागुण जोपासावे याची संस्था नेहेमी काळजी घेते. यासाठी सांस्कृतीक कार्यक्रम (गॅदरींग) आयोजीत केले जाते. यावेळी मुलांमधील छुप्या गुणांना वाव मिळतो. कोणी नृत्यात माहीर असतो तर कोणी संगीतात कोणी नाटकात तर कोणी अॅन्करींग करण्यात प्रविण असतो. हे गुण वर्गाच्या चार भिंतीत नाही आपण पाहु शकत, यासाठी ह्या गुणांना मोकळी वाट देण्यासाठी भव्य गँदरींगचे आयोजन केले जाते. ज्यामुळे मुलांमध्ये स्टेजडेअरींग यावे त्यांच्यातले गुण हे जगासमोर येतांना त्यांची पाऊले डगमगु नयेत.

★ संस्थेचे ध्येय ★

तुम्हा दाखवायची दिशा
सतत तहाणलेल्यांना तृप्त करायची
तुम्हा शिकवायची शक्ती सत्याची
असत्याचा विनाश करण्याची
तुम्हा द्ययची हिम्मत लढण्याची
आयुष्यातील वाटेवर न थांबण्याची
तुम्हा शिकवायचे ना फक्त पुस्तकी पाठ
आयुष्याच्या वाटेवरील धडे अफाट
तुमची पाऊले पडली या दिशेने
तर अभिमान वाटेल आम्हाला
उद्याचा भारत घडवल्याचा
आम्ही शिक्षक धर्म निभवल्याचा